
# डॉ. नरेंद्र जाधव यांना राजीव गांधी पुरस्कार



मुंबई, दि. १६ (प्रतिनिधी)–चरणसिंग सप्रा यांच्या संस्थेतर्फे दिला जाणारा राजीव गांधी पुरस्कार यंदा अर्थतज्ज्ञ व केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांना जाहीर झाला आहे.

डॉ. जाधव यांच्यासह उद्योगपती विनित जैन, पत्रकार रमेशचंद्र अग्रवाल, सॅम पित्रोडा, क्रीडापटू अभिनव बिंद्रा, सुपर अचिव्हर डॉ. जी. माधवन नायर, सामाजिक कार्यकर्त्या राजश्री बिर्ला, रोहीत कोच्चर, कृष्णा पाटील, सिनेअभिनेता शाहीद कपूर, अभिनेत्री कतरीना कैफ आदिंना हा पुरस्कार दिला जाणार आहे.

बुधवार दि. १९ ऑगस्ट रोजी एनसीपीए, नरिमन पॉइंट येथे दुपारी १.३० वाजता होणाऱ्या या पुरस्कार सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीयमंत्री कमलनाथ, विलासराव देशमुख, मुख्यमंत्री अशोक चव्हाण, खा. ज्योतिरादित्य सिंदिया, पेट्रोलियममंत्री मुरली देवरा, केंद्रीय राज्यमंत्री गुरुदास कामत, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे, खा. राजीव शुक्ला, कृपाशंकरसिंग, खा. प्रिया दत्त, खा. मिलिंद देवरा, खा. एकनाथ गायकवाड, खा. संजय निरुपम आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

आपला वार्ताहर
17/8/9

# 'लोकप्रशासन' विषयाचा अभ्यासक्रम नाही!

पुणे, दि. १६ (प्रतिनिधी) - पुणे विद्यापीठात बहिःस्थ विद्यार्थ्यांसाठी 'लोकप्रशासन' विषयाचा अभ्यासक्रमच उपलब्ध नसल्याची धक्कादायक बाब पुढे आली आहे. मराठी भाषेतून या विषयाची संदर्भपुस्तके आणि मार्गदर्शन सुविधाही मिळत नसल्याने परीक्षेची तयारी कशी करावी? असा यक्षप्रश्न विद्यार्थ्यांना पडला आहे.



अभ्यासक्रमच उपलब्ध नसल्यामुळे विशाल डोईफोडे नावाच्या विद्यार्थ्याला बी.ए. अंतिम परीक्षेत एका पेपरमध्ये फक्त ४० गुण मिळाले आहेत. परिणामी त्याची टक्केवारी घसरली आहे. कमी गुण मिळाल्याबाबत डोईफोडेने बहि:स्थ विभागात चौकशी आणि वारंवार पत्रव्यवहार करूनही विद्यापीठाने त्याला साधे उत्तर देण्याचेही सौजन्य दाखविले नाही. तत्कालीन कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांच्याकडे तक्रार करूनही त्याला न्याय मिळाला नाही.

'लोकप्रशासन' हा विषय राज्यशास्त्र विभागाच्या कक्षेत येतो की बहि:स्थ विभागाच्या, याबद्दल विद्यापीठाचे धोरण स्पष्ट नाही. विद्यार्थ्यांनी मागणी करूनही त्यांना प्रश्नपत्रिका, मार्गदर्शन उपलब्ध होत नसल्याचे डोईफोडेने निदर्शनास आणून दिले आहे. विद्यापीठात लोकप्रशासन विषयाच्या अभ्यासासाठी १९६०च्या दशकातील संदर्भपुस्तके उपलब्ध असून, ती सर्वच्या सर्व इंग्रजी भाषेतून आहेत. त्यामुळे मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. अभ्यासक्रम ठरविण्याबाबत विद्यापीठाने पावले उचलली नाही, तर 'यूजीसी'कडे तक्रार करण्याचा इशारा डोईफोडेने दिला आहे.

सामना
17/8/9

# डॉ. नरेंद्र जाधव यांना राजीव गांधी पुरस्कार



मुंबई, दि. १६ (प्रतिनिधी)–चरणसिंग सप्रा यांच्या संस्थेतर्फे दिला जाणारा राजीव गांधी पुरस्कार यंदा अर्थतज्ज्ञ व केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांना जाहीर झाला आहे.

डॉ. जाधव यांच्यासह उद्योगपती विनित जैन, पत्रकार रमेशचंद्र अग्रवाल, सॅम पित्रोडा, क्रीडापटू अभिनव बिंद्रा, सुपर अचिव्हर डॉ. जी. माधवन नायर, सामाजिक कार्यकर्त्या राजश्री बिर्ला, रोहीत कोचर, कृष्णा पाटील, सिनेअभिनेता शाहीद कपूर, अभिनेत्री कतरीना कैफ आदिंना हा पुरस्कार दिला जाणार आहे.

बुधवार दि. १९ ऑगस्ट रोजी एनसीपीए, नरिमन पॉइंट येथे दुपारी १.३० वाजता होणाऱ्या या पुरस्कार सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीयमंत्री कमलनाथ, विलासराव देशमुख, मुख्यमंत्री अशोक चव्हाण, खा. ज्योतिरादित्य सिंदिया, पेट्रोलियममंत्री मुरली देवरा, केंद्रीय राज्यमंत्री गुरुदास कामत, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे, खा. राजीव शुक्ला, कृपाशंकरसिंग, खा. प्रिया दत्त, खा. मिलिंद देवरा, खा. एकनाथ गायकवाड, खा. संजय निरुपम आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

आपलं वार्ताहर
17/8/9

# 'लोकप्रशासन' विषयाचा अभ्यासक्रम नाही!

पुणे, दि. १६ (प्रतिनिधी) - पुणे विद्यापीठात बहिःस्थ विद्यार्थ्यासाठी 'लोकप्रशासन' विषयाचा अभ्यासक्रमच उपलब्ध नसल्याची धक्कादायक बाब पुढे आली आहे. मराठी भाषेतून या विषयाची संदर्भपुस्तके आणि मार्गदर्शन सुविधाही मिळत नसल्याने परीक्षेची तयारी कशी करावी? असा यक्षप्रश्न विद्यार्थ्यांना पडला आहे.

अभ्यासक्रमच उपलब्ध नसल्यामुळे विशाल डोईफोडे नावाच्या विद्यार्थ्याला बी.ए. अंतिम परीक्षेत एका पेपरमध्ये फक्त ४० गुण मिळाले आहेत. परिणामी त्याची टक्केवारी घसरली आहे. कमी गुण मिळाल्याबाबत डोईफोडेने बहिःस्थ विभागात चौकशी आणि वारंवार पत्रव्यवहार करूनही विद्यापीठाने त्याला साधे उत्तर देण्याचेही सौजन्य दाखविले नाही. तत्कालीन कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांच्याकडे तक्रार करूनही त्याला न्याय मिळाला नाही.



'लोकप्रशासन' हा विषय राज्यशास्त्र विभागाच्या कक्षेत येतो की बहिःस्थ विभागाच्या, याबद्दल विद्यापीठाचे धोरण स्पष्ट नाही. विद्यार्थ्यांनी मागणी करूनही त्यांना प्रश्नपत्रिका, मार्गदर्शन उपलब्ध होत नसल्याचे डोईफोडेने निदर्शनास आणून दिले आहे. विद्यापीठात लोकप्रशासन विषयाच्या अभ्यासासाठी १९६०च्या दशकातील संदर्भपुस्तके उपलब्ध असून, ती सर्वच्या सर्व इंग्रजी भाषेतून आहेत. त्यामुळे मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. अभ्यासक्रम ठरविण्याबाबत विद्यापीठाने पावले उचलली नाही, तर 'यूजीसी'कडे तक्रार करण्याचा इशारा डोईफोडेने दिला आहे.

सामना
17/8/1


# विद्यापीठाच्या मुख्य इमारतीच्या बांधकामालाही

# 'स्वाइन फ्लू'चा फटका

## मुदतीत काम पूर्ण होईल की नाही याबाबत शंका

पुणे, दि. १७ (प्रतिनिधी)- शहरात पसरलेल्या स्वाइन फ्लूचा फटका अनेक घटकांना बसला आहे.पुणे विद्यापीठाची देखील यातून सुटका झालेली नाही. गेल्या काही दिवसांपासून शहरातील स्वाइन फ्लू रुग्णांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे विद्यापीठाची शान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विद्यापीठाच्या मुख्य इमारतीचे बांधकाम बंद पडले आहे. त्यामुळे ठरवून दिलेल्या मुदतीमध्ये हे काम पूर्ण होईल की नाही, याबद्दल शंका उपस्थित होत आहे.

पुणे विद्यापीठाच्या मुख्य इमारतीच्या डागडुजीचे काम गेल्या दोन वर्षांपासून सुरू आहे. एका विशिष्ट पद्धतीने बांधण्यात आलेल्या या इमारतीला ऐतिहासिक असे महत्त्व आहे. गव्हर्नरचे पावसाळी निवासस्थान म्हणून ही इमारत ओळखली जात होती. पुढे याच इमारतीमध्ये पुणे विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. गेल्या काही वर्षांपासून पावसाचे पाणी या इमारतींच्या भिंतीमध्ये मुरून इमारतीच्या सभागृहामधील अनेक जुन्या आणि महत्त्वाच्या तैलचित्रांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यावेळच्या कुलगुरू यांनी या गोष्टींकडे दुर्लक्ष करीत या इमारतीच्या दुरुस्तीचा कोणताही निर्णय न घेतल्याने पावसाच्या पाण्यामुळे या इमारतीचे अधिकच नुकसान होत गेले. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांनी, विद्यापीठाचे



कुलगुरू म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतर लगेच या इमारतीच्या दुरुस्तीकडे लक्ष देण्यास सुरुवात केली. ही इमारत ऐतिहासिक असल्याने याच्या डागडुजीसाठी पुरातत्व खात्याची परवानगीची आवश्यकता होती. पावासाच्या पाण्यामुळे या मुख्य इमारतीचे तसेच यामध्ये असलेल्या तैलचित्रांचे अधिक नुकसान होऊ नये यासाठी तत्कालीन कुलगुरु डॉ. जाधव यांनी पुढाकार घेऊन पुरातत्व खात्याची परवानगी मिळवून या संपूर्ण इमारतींच्या डागडुजीचे काम गेल्या वर्षीपासून हाती घेतले आहे.

मुख्य इमारतीच्या डागडुजीमध्ये छताचे काम हे महत्त्वाचे मानले जात होते. गेल्या वर्षीच छताचे काम पूर्ण करण्यात येणार होते. मात्र मागील वर्षी पावसाने जून महिन्यापासून हजेरी लावल्याने हे काम पूर्ण करणे अवघड जात होते. मुख्य इमारतीच्या डागडुजीचे काम करताना विद्यापीठाच्या छताचे काम सर्वांत आधी पूर्ण करण्यासाठी प्राधान्यक्रम देण्यात आला होता. त्यानुसार मुख्य इमारतीच्या दुरुस्तीचे काम दिलेल्या कंत्राटदारांना वेळोवेळी सूचनाही देण्यात आल्या होत्या. या इमारतीची डागडुजी करण्यासाठी पुरातत्व खात्याची परवानगी घेण्यात आली आहे. या इमारतीचे बांधकाम करताना अत्याधुनिक पद्धतीच्या कोणत्याही वस्तूचा वापर न करता जुनी ज्या पद्धतीने ही इमारत बांधली आहे तिला कोणताही धक्का न लावता हे बांधकाम करण्यात येत आहे. गेल्या महिन्यांमध्ये या छताचे काम पूर्ण झाले होते. त्यामुळे या इमारतीचे पुढील काम लवकरच पूर्ण होईल, असा विश्वास विद्यापीठाच्या प्रशासनाने व्यक्त केला होता.

विद्यापीठाची शान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या मुख्य इमारतीचे काम डिसेंबर अखेरपर्यंत तर या इमारतीमध्ये असलेल्या कुलगुरु कार्यालयाचे काम पुढील महिन्याच्या १५ सप्टेंबरपर्यंत पूर्ण करण्यात येणार होते. मात्र गेल्या काही दिवसांपासून शहरात वाढत असलेल्या स्वाइन फ्लूच्या आजारामुळे खबरदारीचा उपाय म्हणून या मुख्य इमारतीच्या दुरुस्तीचे काम बंद ठेवण्यात आले आहे. असे विद्यापीठातून सांगण्यात आले. तर हा आजार आपल्याला होईल या भीतीने अनेक कामगार हे गेल्या काही दिवसांपासून कामावरच न आल्याने हे काम बंद ठेवण्यात आल्याचे विद्यापीठातील सूत्रांनी सांगितले. पुढील काही दिवस तरी हे काम सुरू होण्याची शक्यता नसल्याचे या सूत्रांनी सांगितले. याबाबत अधिक माहितीसाठी विद्यापीठ प्रशासनाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही.

प्रभात
१८।८।७

चिंतन इमेज मेकर्स

# 'आपत्ती व्यवस्थापन' अभ्यासक्रम यंदा सक्तीचा नाही

## डॉ. नरेंद्र जाधव यांचे स्वप्न अपूर्णच राहणार

(चैतन्य मचाले)

पुणे, दि. १८- पुणे विद्यापीठातील पदवीचे शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना येत्या शैक्षणिक वर्षापासून 'आपत्ती व्यवस्थापन' हा अभ्यासक्रम सक्तीचा करण्यात येणार आहे, अशी घोषणा विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी मोठ्या आत्मविश्वासाने केली होती. मात्र या नवीन अभ्यासक्रमाचा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश करण्याची परवानगीच शासनाने अद्यापही न दिल्याने डॉ. जाधव यांनी आठ महिन्यांपूर्वी पाहिलेले हे स्वप्न यंदा तरी स्वप्नच राहणार आहे.

गेल्या वर्षी २६/११ ला मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर या पुढील काळात अशा प्रकारचे कोणतेही संकट उभे राहिल्यास त्याला कसे सामोरे जायचे याची माहिती मिळावी. यासाठी पुणे विद्यापीठातील पदवीचे शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना 'आपत्ती व्यवस्थापन' हा अभ्यासक्रम सक्तीचा करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय विद्यापीठाचे त्यावेळचे कुलगुरू ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांनी घेतला होता.

येत्या शैक्षणिक वर्षापासून या विषयाचा अभ्यासक्रम सक्तीचा करण्यात येणार असल्याची घोषणादेखील डॉ. जाधव यांनी केली होती. शहरात आयोजित करण्यात आलेल्या ज्या ज्या सार्वजनिक कार्यक्रमांना कुलगुरू म्हणून डॉ. जाधव हजेरी लावत त्या प्रत्येक कार्यक्रमांमध्ये ते आपल्या भाषणामध्ये या विषयाचा उल्लेख करीत. ते यंदाच्या वर्षीपासून विद्यापीठातील प्रत्येक विद्यार्थ्याला हा अभ्यासक्रम सक्तीचा करण्यात येणार असल्याची माहिती देत आणि या विषयाचे महत्त्वदेखील उपस्थितांना पटवून सांगत होते.

भविष्यकाळात काही संकट अथवा आपत्ती निर्माण झाल्यास ही परिस्थिती कशी हाताळावी, याची माहिती महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मिळावी. यासाठी हा अभ्यासक्रम शिकविण्यात येणार होता. या अभ्यासक्रमात कोणत्या बाबींचा समावेश असावा याची माहिती घेऊन



तो अभ्यासक्रम तयार करण्याचे कामदेखील गेल्या काही महिन्यांपासून सुरू होते. एका समितीने या अभ्यासक्रमाचा आराखडा तयार करून त्याला अंतिम स्तरापर्यंत नेऊन ठेवले होते. याच काळात डॉ. जाधव यांची नियोजन आयोगाच्या सदस्यपदी निवड झाल्याने विद्यापीठाचे उपकुलगुरू म्हणून काम करणाऱ्या डॉ. अरुण अडसूळ यांच्याकडे विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू म्हणून जबाबदारी देण्यात आली.

त्यांनीदेखील हा अभ्यासक्रम सुरू व्हावा यासाठी हा अभ्यासक्रम तयार करणाऱ्या अभ्यासमंडळाला प्रोत्साहन दिले. अनेक तज्ज्ञांशी चर्चा करून तयार करण्यात आलेल्या या अभ्यासक्रमाला दोन महिन्यांपूर्वी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत याला अंतिम मंजुरी देण्यात येणार होती.

विद्यापीठाने पुढाकार घेऊन तयार करण्यात आलेल्या या अभ्यासक्रमाचा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश करून घेण्याची परवानगी शासनाकडून घ्यावी लागते. तसा प्रस्तावदेखील



विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने शासनाला पाठविण्यात आला होता. मात्र शासनदरबारी या प्रस्तावाची कोणतीही दखल न घेतल्याने आणि या प्रस्तावाला कोणतीही मंजुरी न दिल्याने यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना सक्तीचा करता येणार नाही.

या अभ्यासक्रमांद्वारे पुणे विद्यापीठातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना 'आपत्ती व्यवस्थापना'चे धडे देण्याचे विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी पाहिलेले स्वप्न यंदाच्या वर्षी तरी स्वप्नच राहणार असल्यावर आता शिक्कामोर्तब झाले आहे.

### अभ्यासक्रवारच 'आपत्ती'?

गेल्या दोन-तीन वर्षांपूर्वी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना 'पर्यावरण शास्त्र' हा विषय अभ्यासक्रमात सक्तीचा करण्यात आला होता. मात्र, पुढे तो बंद करण्यात आला. 'आपत्ती व्यवस्थापन' या विषयाच्या बाबतीतही असे घडेल का? असे विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. जाधव यांना वेळोवेळी विचारण्यात आले होते. मात्र, त्यांचा विश्वास अत्यंत दृढ असल्याने त्यांनी प्रत्येक वेळेस हा अभ्यासक्रम सुरू होणारच असे सांगितले होते. हा अभ्यासक्रम शिकविताना विद्यार्थ्यांना काही अडचणी येऊ नयेत यासाठी मार्च-एप्रिल महिन्यांपासूनच महाविद्यालयांतील शिक्षकांना 'आपत्ती व्यवस्थापना'चे प्रशिक्षण देण्यात येत होते. तळेगाव येथील राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेमध्ये हे प्रशिक्षण देण्यात येत होते. मात्र, शासनाने यंदाच्या वर्षी या अभ्यासक्रमाला परवानगी न दिल्याने हे प्रशिक्षणदेखील सध्या बंद करण्यात आले आहे.

प्रभात 19/8/9

लोकमत

फॉन्टफ्रीडम मायबोली

**Microfinance Empowers**
Join us in enabling the poorest of the poor to improve their own lives
Соціальна реклама на Google

# डॉ. नरेंद्र जाधव, कृष्णा पाटील, राजश्री बिर्ला यांना 'राजीव गांधी पुरस्कार' प्रदान

(२०-०८-२००९ : २:०९:५३)

मुंबई, दि. १९ (प्रतिनिधी) : नियोजन आयोगाचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र जाधव, अभिनेता शाहीद कपूर, अभिनव बिंद्रा यांनी आपापल्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून देशाचे नाव उज्ज्वल केले. त्यामुळे त्यांना राजीव गांधी ॲवॉर्ड समितीच्या वतीने केंद्रीय मंत्री विल ासराव देशमुख, सुबोधकांत सहाय, ज्योतिरादित्य शिंदे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत मुंबईत झालेल्या एका शानदार सोहळ्यात पु रस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

राजीव गांधी यांच्या जयंती निमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना राजीव गांधी ॲवॉर्ड कमिटीच्या वतीने दरवर्षी सन्मानित करण्यात येते. एनसीपीए थिएटरमध्ये झालेल्या एका शानदार सोहळ्यात डॉ. नरेंद्र जाधव यांनी शैक्षणिक क्षेत्रात भारताचे नाव उज्ज्वल करण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल तर चित्रपट अभिनेता शाहीद कपूर यांनी कमी कालावधीत या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल उत्कृष्ट अभिनेता व कॅटरिना कैफला उत्कृष्ट अभिनेत्री हा पुरस्कार देण्यात आला.

क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल नेमबाज अभिनव बिंद्रा, सामाजिक क्षेत्रातील कामगिरीबद्दल राजश्री बिरला, एव्हरेस्टवीर कृष्णा पाटील, औद्योगिक क्षेत्रातील कामगिरीसाठी विनीत जैन, पत्रकारीतेतील उल्लेखनीय कार्यासाठी रमेशचंद्र अग्रवाल, तांत्रिक प्रगतीसाठी सॅम पित्रोडा, जी माधव नायर, रोहित कोचर यांनी आपापल्या क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल तर बालकलाकार अविका गौर हिला तिच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी १२व्या राजीव गांधी ॲवॉर्डने गौरविण्यात आले.

या प्रसंगी केंद्रीय मंत्री विलासराव देशमुख, सुबोधकांत सहाय, ज्योतिरादित्य शिंदे, विलास मुत्तेमवार, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे, मुंबई अध्यक्ष कृपाशंकर सिंह, राज्यसभा सदस्य राजीव शुक्ला, खा. एकनाथ गायकवाड, मिलिंद देवरा, संजय निरुपम, अझरुद्दीन आदी मान्यवर उपस्थित होते. राजीव गांधी ॲवॉर्ड कमिटीचे अध्यक्ष आ. चरणसिंग सप्रा यांनी या ॲवॉर्डमागची भूमिका स्पष्ट केली.

या बातमी वरील वाचकांच्या प्रतिक्रिया

ही बातमी प्रिंट करा | ही बातमी मित्राला इ-मेल करा | आपली प्रतिक्रिया

Archives | About Us | Feedback | Contact
Copyright : Lokmat Newspapers Ltd - 2007
Developed, Hosted and Maintained by
MasterMind Technologies, Mumbai

लोकमत

## डॉ. नरेंद्र जाधव, कृष्णा पाटील, राजश्री बिर्ला यांना

# 'राजीव गांधी पुरस्कार' प्रदान

मुंबई, दि. १९ (प्रतिनिधी) : नियोजन आयोगाचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र जाधव, अभिनेता शाहीद कपूर, अभिनव बिंद्रा यांनी आपापल्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून देशाचे नाव उज्ज्वल केले. त्यामुळे त्यांना राजीव गांधी अ‍ॅवॉर्ड समितीच्या वतीने केंद्रीय मंत्री विलासराव देशमुख, सुबोधकांत सहाय, ज्योतिरादित्य शिंदे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत मुंबईत झालेल्या एका शानदार सोहळ्यात पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

राजीव गांधी यांच्या जयंती निमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना राजीव गांधी अ‍ॅवॉर्ड कमिटीच्या वतीने दरवर्षी



डॉ. नरेंद्र जाधव

सन्मानित करण्यात येते. एनसीपीए थिएटरमध्ये झालेल्या एका शानदार सोहळ्यात डॉ. नरेंद्र जाधव यांनी शैक्षणिक क्षेत्रात भारताचे नाव उज्ज्वल करण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल तर चित्रपट अभिनेता शाहीद कपूर यांनी कमी कालावधीत या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल उत्कृष्ट अभिनेता व कॅटरिना कैफला उत्कृष्ट अभिनेत्री हा पुरस्कार देण्यात आला.

क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल नेमबाज अभिनव बिंद्रा, सामाजिक क्षेत्रातील कामगिरीबद्दल राजश्री बिरला, एव्हरेस्टवीर कृष्णा पाटील, औद्योगिक क्षेत्रातील कामगिरीसाठी विनीत जैन, पत्रकारीतेतील उल्लेखनीय कार्यासाठी रमेशचंद्र अग्रवाल, तांत्रिक प्रगतीसाठी सॅम पित्रोडा, जी माधव नायर, रोहित कोचर यांनी आपापल्या क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल तर बालकलाकार अविका गौर हिला तिच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी १२व्या राजीव गांधी अ‍ॅवॉर्डने गौरविण्यात आले.

या प्रसंगी केंद्रीय मंत्री विलासराव देशमुख, सुबोधकांत सहाय, ज्योतिरादित्य शिंदे, विलास मुत्तेमवार, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे, मुंबई अध्यक्ष कृपाशंकर सिंह, राज्यसभा सदस्य राजीव शुक्ला, खा. एकनाथ गायकवाड, मिलिंद देवरा, संजय निरुपम, अझरुद्दीन आदी मान्यवर उपस्थित होते. राजीव गांधी अ‍ॅवॉर्ड कमिटीचे अध्यक्ष आ. चरणसिंग सप्रा यांनी या अ‍ॅवॉर्डमागची भूमिका स्पष्ट केली.



◄अभिनव बिंद्रा



कॅटरिना कैफ►

लोकमत २०।८।९

लोकमत

FREEDOM TO FLY
GET DISCOUNTED AIRFARE ON ALL MAJOR AIRLINES
RS.251 OFF RS.75-250 OFF make My trip Book Now
JET AIRWAYS *T&C Apply

फॉन्टबद्दल मदत Font Help

गुरुवार २० ऑगस्ट २००९ भारतीय सौर श्रावण २९,शके १९३१ (Last Update:20-08-2009,9:45 am)

आवृत्ती | आंतरराष्ट्रीय | राष्ट्रीय | महाराष्ट्र | व्यापार | कृषी | क्रीडा | हवामान

नागपूर
पुणे
औरंगाबाद
नाशिक
जळगाव
मुंबई
अहमदनगर
सोलापूर
सातारा
सांगली
कोल्हापूर
अकोला
गोवा

सोने चांदी
छोट्या जाहिराती
संपादकीय
प्रतिक्रिया
साप्ताहिक भविष्य
मासिक भविष्य
Ganeshaspeaks astrology by bejan daruwalla
परिप
शुभेच्छापत्रे

मराठी ब्लॉग वाचकांचे व्यासपीठ
लोकमत ई-पेपर
मंथन
आविष्कार
सखी

आजच्या लोकमत इंटरनेट आवृत्तीत ५३५ बातम्यांचा समावेश आहे. ● लोकमत ● लोकमत ● 'राजीव गांधी पुरस्कार' प्रदान सोहळ्याची क्ष

## 'राजीव गांधी पुरस्कार' प्रदान सोहळ्याची क्षणचित्रे

(२०-०८-२००९ : ३:०५:३५)




## डॉ. नरेंद्र जाधव, कृष्णा पाटील, राजश्री बिर्ला यांना 'राजीव गांधी पुरस्कार' प्रदान

(२०-०८-२००९ : २:०९:५३)

मुंबई, दि. १९ (प्रतिनिधी) : नियोजन आयोगाचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र जाधव, अभिनेता शाहीद कपूर, अभिनव बिंद्रा यांनी आपापल्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून देशाचे नाव उज्ज्वल केले. त्यामुळे त्यांना राजीव गांधी ॲवॉर्ड समितीच्या वतीने केंद्रीय मंत्री विलासराव देशमुख, सुबोधकांत सहाय, ज्योतिरादित्य शिंदे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत मुंबईत झालेल्या एका शानदार सोहळ्यात पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

### जसवंत यांची भाजपमधून हकालपट्टी ; जीनाप्रेम भोवले !

(२०-०८-२००९ : २:११:५४)



सिमला, दि. १९ (वृत्तसंस्था): आपल्या पुस्तकात बॅरि.मोहंमद अली जीना यांची स्तुती करणारे भाजापचे ज्येष्ठ नेते जसवंतसिंह यांची आज पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. जीना यांची प्रशंसा केल्याने भाजप व संघ परिवाराने जसवंतसिंह यांना लक्ष्य बनविले होते. भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांची आज येथे चिंतन बैठक झाली. या बैठकीच्या उद्घाटन सत्रात भाजप संसदीय मंडळाची बैठक झाली त्यात माजी केंद्रीय मंत्री व दार्जिलिंग येथील भाजपचे खासदार जसवंतसिंह यांना भाजपतून काढून टाकण्याचा निर्णय घेण्यात आला.

### निम्म्या देशात दुष्काळ ; केंद्रीय कृषिमंत्र्यांची कबुली; २४६ जिल्ह्यांमध्ये संकट

(२०-०८-२००९ : २:१६:३७)



नवी दिल्ली, दि. १९ (वृत्तसंस्था) : देशातील २४६ जिल्ह्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती आहे. अनेक ठिकाणी दुष्काळाचे संकट समोर उभे ठाकले आहे. देशाच्या निम्म्या भागात आज दुष्काळ आहे, या शब्दांत केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी परिस्थितीची कबुली दिली आहे. विविध राज्यांच्या नागरी अन्नपुरवठा मंत्र्यांसोबत कृषिमंत्री पवार यांची आज बैठक झाली. या बैठकीत दुष्काळी जिल्ह्यांची संख्या वाढल्याचे लक्षात आले. २ दिवसांपूर्वी दुष्काळी जिल्ह्यांची संख्या २०७ होती; आज हे प्रमाण २४६ वर पोहोचल्याचे लक्षात आले. बैठकीत बोलताना पवार म्हणाले, अपुऱ्या पावसामुळे दुष्काळी जिल्ह्यांच्या संख्येत वाढ झाली आहे. नेहमीपेक्षा पावसाचे प्रमाण २९ टक्क्यांनी कमी राहिले.

### लोकप्रतिनिधींचे २० टक्के वेतन कापणार ; दुष्काळग्रस्तांसाठी सोनियांच्या प्रस्तावाला काँग्रेसची एकमताने मंजुरी

(२०-०८-२००९ : २:१४:१०)

नवी दिल्ली, १९ (प्रतिनिधी) : देशातील जवळपास २०० जिल्ह्यांत दुष्काळाची स्थिती निर्माण झाली आहे. याचा सामना करण्यासाठी काँग्रेसच्या प्रत्येक कार्यकर्त्याने प्रशासनाला सहकार्य करावे, तर देशभरातील काँग्रेसच्या लोकप्रतिनिधींनी एक वर्षभर आपल्या वेतनातील २० टक्के भाग हा दुष्काळासाठी द्यावा असे आवाहन काँग्रेसच्या

कॉल सेंटर Courses
English Skills तेज करें और BPO में नौकरी पाएं
NIITUniqua.com/BPO-Tr

G2
Readership Survey
वैशाखी
Book Online Now